**सुविचार**

व्यवहारात आपण दुसऱ्याची लबाडी ओळखून वागावे, एवढीच लबाडी आपल्यामध्ये असावी. - अज्ञात

दैनिक
# आपला विदर्भ

apalavidarbhlivenews@gmail.com

मुख्य संपादक : देविदास खनपटे मो. 9767233034

■ बुलढाणा ■ वाशिम ■ यवतमाळ ■ अमरावती ■ वर्धा ■ नागपूर ■ गोंदिया ■ भंडारा ■ चंद्रपूर ■ गडचिरोली ■ छत्रपती संभाजीनगर ■ मुंबई

■ दैनिक ■ बुलडाणा ■ वर्ष 04 ■ अंक 177 ■ शुक्रवार, दि. 06 फेब्रुवारी 2026 ■ पाने 4 ■ किंमत रु. 2 ■ RNI.NO.MAHMAR/2023/88006




मिर्झापूर द मूव्ही होणार या दिवशी रिलीज, जाणून घ्या तारीख...

# गृहनिर्माणासह पायाभूत विकासात कॅनडाचे सहकार्य राज्यासाठी महत्त्वपूर्ण ठरेल : मुख्यमंत्री फडणवीस

## महाराष्ट्रातील पायाभूत सुविधांच्या विकासासाठी कॅनडाची भागीदारी

**दैनिक आपला विदर्भ**

**मुंबई/प्रतिनिधी :** महाराष्ट्राच्या विकासात योगदान देण्यासाठी कॅनडा उत्सुक आहे. कॅनडियन इन्फ्रास्ट्रक्चर बँकेच्या सहभागातून गृहनिर्माण व पायाभूत क्षेत्रातील दोन महत्त्वाच्या प्रकल्पांमध्ये गुंतवणुकीद्वारे या सहकार्याची सुरुवात केली जाईल. कॅनडाच्या वित्तीय व तांत्रिक सहकार्यामुळे महाराष्ट्रातील पायाभूत विकासाला नवी दिशा मिळेल, असे प्रतिपादन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केले.

मुख्यमंत्र्यांच्या 'वर्षा' निवासस्थानी कॅनडा इन्फ्रास्ट्रक्चर बँकेचे मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ. सेबास्टियन यांच्याशी दूरदृश्य प्रणालीद्वारे संवाद साधण्यात आला. यावेळी वित्त व



नियोजन विभागाचे अपर मुख्य सचिव ओ. पी. गुप्ता, परिवहन विभागाचे अपर मुख्य सचिव संजय सेठी, सार्वजनिक बांधकाम विभागाचे अपर मुख्य सचिव मिलिंद म्हैसकर, कृषी विभागाचे अपर मुख्य सचिव विकासचंद्र रस्तोगी, नगरविकास विभागाचे अपर मुख्य सचिव असीम गुप्ता, एमएमआरडीएचे महानगर आयुक्त डॉ.संजय मुखर्जी, बृहन्मुंबई महानगरपालिकेचे आयुक्त भूषण गगराणी, सिडकोचे व्यवस्थापकीय संचालक विजय सिंगल, मुख्यमंत्र्यांचे प्रमुख आर्थिक व गुंतवणूक सल्लागार कौस्तुभ धवसे, अभिनेता अजिंक्य देव आणि अतुल गुप्ता उपस्थित होते.

कॅनडा इन्फ्रास्ट्रक्चर बँकेच्या गुंतवणुकीसंदर्भात आठ प्रमुख मुद्द्यांवर आधारित सविस्तर सादरीकरण यावेळी करण्यात आले.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले की, राज्यात विविध पायाभूत विकास प्रकल्प सुरू आहेत. यासाठी आंतरराष्ट्रीय सहकार्याचा लाभ घेण्यात येणार आहे. म्हाडा तसेच मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाच्या (एमएमआरडीए) महत्त्वाच्या उपक्रमांसाठी हे सहकार्य उपयुक्त ठरेल. प्राथमिक टप्प्यात दोन प्रकल्पांची निवड करून भागीदारीच्या दृष्टीने चर्चा केली जाईल, असेही मुख्यमंत्री फडणवीस यांनी सांगितले.

यावेळी डॉ. सेबास्टियन यांनी महाराष्ट्रातील पायाभूत विकासासाठी कॅनडाच्या वित्तपुरवठा साखळीच्या माध्यमातून विविध तांत्रिक व आर्थिक उपाययोजनांची एकत्रित अंमलबजावणी करण्यात येईल, तसेच आवश्यकतेनुसार जी-२० ऑफटेकसह उच्च दर्जाची 'ट्रिपल-ए' रेटेड विश्वासार्हता प्रदान करण्यात येईल, अशी वचनबद्धता व्यक्त केली.

पायाभूत विकासासाठी गुंतवणुकीची वैशिष्ट्ये :

रुपयांमध्ये निधीचे विनियमन :

स्थानिक चलनात गुंतवणूक व यजमान देशातच निधीची पुनर्गुंतवणूक करण्याची तरतूद असून, त्यामुळे निधी परत पाठवण्याचा धोका राहणार नाही. हेजिंग किंवा स्वॅप प्रणालीची आवश्यकता भासणार नाही.

वन-स्टॉप सोल्यूशन :

सुरक्षित, एन्क्रिप्टेड वेब-आधारित व ऑनलाईन प्लॅटफॉर्मद्वारे कॅनडाशी संबंधित प्रकल्पांसाठी उद्योग, संसाधने, नेटवर्क आणि राज्य शासनाच्या प्रणालींशी जोडलेले सर्वसमावेशक 'वन-स्टॉप सोल्यूशन' उपलब्ध करून देण्यात येणार आहे.

टर्न-की प्रकल्प अंमलबजावणी :

राज्य शासन किंवा स्थानिक स्वराज्य संस्थांच्या प्रकल्पांसाठी निधी उपलब्धता, दीर्घकालीन परतफेडीची मुदत तसेच विमा संरक्षणाद्वारे जोखीम कमी करण्याची व्यवस्था करण्यात येणार आहे.

तांत्रिक सहकार्य :

प्रमुख प्रकल्प व्यवस्थापन, कार्यान्वयन व देखरेख प्रक्रियांमध्ये कॅनडाचे तांत्रिक सहकार्य लाभणार असून, स्थानिक भागीदारांच्या सहभागातून प्रकल्प प्रभावीपणे राबविण्यात येतील.

## ओला,उबरला पर्यायी भारत टॅक्सी ॲप लाँच

**नवी दिल्ली/वृत्तसंस्था :** केंद्रीय सहकार मंत्री अमित शहा यांनी आज म्हणजेच गुरुवारी (५ फेब्रुवारी २०२६) भारतातील पहिले सहकारी-आधारित राइड-हेलिंग प्लॅटफफॉर्म, भारत टॅक्सी हे ॲप अधिकृतपणे लाँच केले. पुढील दोन वर्षांत ही सेवा सर्व राज्ये आणि शहरांमध्ये विस्तारण्याचे सरकारचे उद्दिष्ट आहे. हे ॲप ओला आणि उबर सारख्या प्रस्थापित ॲपना टक्कर देईल अशी चर्चा आहे.

सहकार मंत्रालयाच्या एका निवेदनानुसार, बहु-राज्य सहकारी संस्था कायदा, २००२ अंतर्गत नोंदणीकृत भारत टॅक्सीची स्थापना ६ जून २०२५ रोजी करण्यात आली. ही टॅक्सी शून्य-कमिशन आणि वाढीव किंमत मॉडेलवर चालते, ज्याचा फायदा थेट चालकांना वाटला जातो. हे परदेशी गुंतवणुकीच्या प्लॅटफफॉर्मला स्वदेशी पर्याय ठरणार आहे. आठ प्रमुख सहकारी संस्थांच्या पाठिंब्याने, या प्लॅटफफॉर्मने २ डिसेंबर रोजी दिल्ली-एनसीआर आणि गुजरातमध्ये पायलट ऑपरेशन्स सुरू केले. ते ओला, उबर आणि रॅपिडो सारख्या स्थापित कंपन्यांना आव्हान देईल.

मंत्रालयाचा दावा आहे की हे जगातील पहिले आणि सर्वात मोठे सहकारी-आधारित राइड-हेलिंग प्लॅटफफॉर्म आहे. हे जगातील सर्वात मोठे ड्रायव्हर-मालकांचे मोबिलिटी प्लॅटफफॉर्म देखील आहे. लाँच झाल्यापासून, ३००,००० हून अधिक ड्रायव्हर्स या प्लॅटफफॉर्ममध्ये सामील झाले आहेत. १,००,००० हून अधिक वापरकर्त्यांनी नोंदणी केली आहे.

ड्रायव्हर्सना थेट १० कोटी मिळणार:

दिल्ली-एनसीआर आणि गुजरातमध्ये दररोज १०,००० हून अधिक राईड्स पूर्ण केल्या जात आहेत. आतापर्यंत जवळजवळ १० कोटी रुपये थेट ड्रायव्हर्सना वितरित करण्यात आले आहेत. ''सारथी'' नावाच्या या प्लॅटफफॉर्ममध्ये आरोग्य विमा, अपघात विमा, रिटायरमेंट सेविंग्स आणि समर्पित समर्थन प्रणालीद्वारे ड्रायव्हर्ससाठी सामाजिक सुरक्षेला प्राधान्य दिले जाते. दिल्लीमध्ये सात ठिकाणी यासाठी सहायता केंद्रे कार्यरत आहेत.

## मुंढवा जमीन खरेदी गैरव्यवहार प्रकरणी पार्थ पवारांना क्लिनचीट मिळण्याची शक्यता

**पुणे/प्रतिनिधी :** पुण्यातील मुंढवा येथील महार वतन जमीन खरेदी गैरव्यवहार प्रकरणी पार्थ पवार यांना क्लिनचीट मिळण्याची शक्यता आहे. पुढील आठवड्यात विकास खारगे समिती मुख्यमंत्र्याना अहवाल सादर करणार आहे. या व्यवहारात नाव किंवा स्वाक्षरी नसल्याने पार्थ पवार यांना 'क्लीन चिट' मिळणार असल्याची सुत्रांची माहिती आहे. दिवंगत उपमुख्यमंत्री अजित पवार यांचे पुत्र पार्थ पवार यांच्यावर या प्रकरणी गंभीर आरोप झाले होते. या जमीन व्यवहारात प्रत्यक्ष सहभागी असलेले अमेडिया कंपनीचे संचालक दिग्विजय पाटील, कंपनीला जमीन विक्री करणाऱ्या शीतल तेजवानी आणि संबंधित नोंदणी अधिकारी यांना दोषी धरण्यात आल्याची माहिती सुत्रांनी दिली आहे.



तर अमेडिया कंपनीकडून या व्यवहाराचे २१ कोटी रुपयांचे मुद्रांक शुल्क वसूल करावे, अशी शिफारस अहवालात करण्यात आल्याची ही माहिती आहे. अमेडिया कंपनीत पार्थ पवार यांची भागीदारी असून कंपनीने १,८०० कोटी रुपये बाजारमूल्य असलेली महार वतनाची ४० एकर जमीन अवघ्या ३०० कोटींना खरेदी केल्याचा आरोप त्यांच्यावरती करण्यात आला होता. आयटी पार्क उभारण्यात येणार असल्याचे सांगून कंपनीने २१ कोटी रुपयांचे मुद्रांक शुल्कही माफ करून घेतले होते. सरकारी जमिनीची खरेदी-विक्री होत नसताना या जमिनीचा व्यवहार झालाच कसा यावरून पार्थ पवार यांच्यावर आरोप-प्रत्यारोप झाले होते. याप्रकरणी तहसीलदार सूर्यकांत येवले, उपनिबंधक रवींद्र तारू यांना निलंबित करुन तहसीलदार सूर्यकांत येवले आणि रवीद्र तारू यांना पोलिसांनी ताब्यात घेतलं होतं. तर खरेदी-विक्रीतील शीतल तेजवानी यांनाही अटक करण्यात आली होती.

मुंढवा जमीन गैरव्यवहार प्रकरणात पुणे पोलिसांच्या आर्थिक गुन्हे शाखेने मोठी कारवाई करत मुख्य आरोपी शीतल तेजवाणी हिच्याविरोधात तब्बल १८८६ पानांचे दोषारोपपत्र न्यायालयात दाखल केले आहे. विशेष बाब म्हणजे, या चार्जशीटमध्ये पार्थ पवार आणि दिग्विजय पाटील यांची नावे समाविष्ट करण्यात आलेली नाहीत. त्यामुळे या दोघांना या प्रकरणात मोठा दिलासा मिळाला आहे. मुंढवा परिसरातील जमीन गैरव्यवहार प्रकरणात सुरुवातीपासूनच अनेक मोठी नावे चर्चेत होती. तपासादरम्यान पार्थ पवार आणि दिग्विजय पाटील यांच्यावरही संशय व्यक्त करण्यात आला होता. मात्र आर्थिक गुन्हे शाखेने सखोल तपासानंतर दाखल केलेल्या दोषारोपपत्रात या दोघांविरोधात कोणतेही आरोप सिद्ध न झाल्याचे स्पष्ट झाले आहे. परिणामी, या प्रकरणात शीतल तेजवाणी हिच्यावरच सर्व आरोप ठेवण्यात आले आहेत.

चार्जशीटनुसार, जमीन व्यवहारात नियमबाह्य कागदपत्रे, आर्थिक फसवणूक आणि गैरमार्गाने लाभ मिळवण्याचे आरोप शीतल तेजवाणीवर करण्यात आले आहेत. तपासात मिळालेल्या पुराव्यांच्या आधारे तिच्याविरोधात विस्तृत स्वरूपात दोषारोपपत्र दाखल करण्यात आल्याचे पोलिसांनी स्पष्ट केले आहे.

दरम्यान, राष्ट्रवादी कॉंग्रेसचे नेते अजित पवार यांच्या निधनानंतर पार्थ पवार यांच्यावर दु:खाचा डोंगर कोसळलेला असतानाच, या प्रकरणात चार्जशीटमध्ये त्यांचे नाव नसल्याने त्यांना मानसिक दिलासा मिळाल्याचे मानले जात आहे. या जमीन गैरव्यवहार प्रकरणात पार्थ पवार आणि दिग्विजय पाटील यांच्यावर आरोप करण्यात आले होते, मात्र प्रत्यक्ष दोषारोपपत्रात त्यांचा समावेश न झाल्याने त्यांची बाजू बळकट झाली आहे.

या प्रकरणात चार्जशीट दाखल होण्यापूर्वी सामाजिक कार्यकर्त्या अंजली दमानिया यांनी या व्यवहाराची सखोल चौकशी व्हावी, अशी मागणी केली होती. पार्थ पवार आणि दिग्विजय पाटील यांची नावे आरोपपत्रात का आहेत किंवा का नाहीत, याबाबत स्पष्टता यावी, अशी भूमिका त्यांनी घेतली होती.

## लाडक्या लेकी वाऱ्यावर...

### राज्यातील तब्बल ११६४ शाळांमध्ये साधं...; धक्कादायक वास्तव

**दैनिक आपला विदर्भ**

**नवी दिल्ली/वृत्तसंस्था :** शिक्षण क्षेत्रासाठी यंदाच्या केंद्रीय अर्थसंकल्पामध्ये अनेक तरतुदी करण्यात आल्या. शिक्षणाला प्रोत्साहन देण्यासाठी म्हणून केंद्रच नव्हे तर राज्य शासनाकडूनही अनेकदा काही महत्त्वाची पावलं उचलली जातात. मात्र याच शिक्षण क्षेत्राचं दाहक वास्तव नुकतंच समोर आलं आहे. महाराष्ट्रात एकिकडे राज्य विकासाच्या दिशेनं झपाझप पावलं टाकत असतानाच शिक्षणाचा मुद्दा आणि त्यातही ज्ञानार्जनासाठी जाणाऱ्या विद्यार्थ्यांना दिल्या जाणाऱ्या सुविधांबाबत मात्र राज्य मागेच असल्याचं स्पष्ट होत आहे.

**राज्यातील कोणत्या शाळांमध्ये लाडक्या लेकी वाऱ्यावर?**

वस्तूस्थिती आणि अहवालातून समोर आलेल्या वृत्तानुसार राज्यातील ११६४ शाळांमध्ये मुलींसाठी स्वतंत्र प्रसाधनगृहाची सोय नाही. तर, ३३२८ शाळांमध्ये वीजपुरवठा नसल्याचीही बाब उघड करण्यात आली आहे. शिक्षण विभागाच्या सांख्यिकी अहवालातून ही आकडेवारी समोर आली असून, मुलींसाठी स्वतंत्र प्रसाधनगृह नसणाऱ्या शाळांमध्ये १०४३ शासकीय, ६४ खासगी अनुदानित, २० खासगी विनाअनुदानित आणि ३७ सेल्फ फायनान्स शाळांचा समावेश आहे.

उपलब्ध माहितीनुसाकर २०२४- २०२६ दरम्यानच्या कालावधीतील शिक्षण विभागाचा हा अहवाल जानेवारी महिन्यात शिक्षण विभागाच्या प्रधान सचिवांना सादर करण्यात आला. त्यातून शाळांमधील हे भीषण वास्तव समोर आलं.

**कोणत्या जिल्ह्यात परिस्थिती अतिशय वाईट?**

अहवालानुसार मुलींसाठी स्वतंत्र प्रसाधनगृह नसलेल्या सर्वाधिक शाळा बीड जिल्ह्यात असून, ही आकडेवारी आहे ११२. हिंगोली, नांदेड, परभणी, गडचिरोली, जळगाव, अमरावती, नाशिक मध्येही अशा काही शाळा आहेत. तर, मुंबई, गोंदिया, कोल्हापूर, सातारा आणि ठाणे जिल्ह्यांमध्ये मात्र मुलींसाठी स्वतंत्र प्रसाधनगृहांची शंभर टक्के सुविधा आहे असंही हा अहवाल सांगतो.




# राष्ट्रीय बीच रस्सीखेच स्पर्धेत महाराष्ट्राचा दबदबा

## बुलढाणा जिल्ह्यातील खेळाडूंना दुहेरी सुवर्णपदकाची ऐतिहासिक कामगिरी

**दैनिक आपला विदर्भ**

■ देवानंद सानप

**लोणार :** टग ऑफ वॉर फेडरेशन ऑफ इंडिया यांच्या मार्गदर्शनाखाली महाराष्ट्र टग ऑफ वॉर असोसिएशन व पालघर जिल्हा टग ऑफ वॉर असोसिएशन यांच्या संयुक्त विद्यमाने दिनांक २८ ते ३० जानेवारी २०२६ दरम्यान शिरगाव बीच, पालघर येथे २७ वी राष्ट्रीय सब-ज्युनियर बीच रस्सीखेच स्पर्धा मोठ्या उत्साहात पार पडली. या राष्ट्रीय स्पर्धेत महाराष्ट्र संघाने उत्कृष्ट खेळाचे प्रदर्शन करत दुहेरी सुवर्णपदक पटकावले असून या यशात बुलढाणा जिल्ह्यातील खेळाडूंचा मोलाचा वाटा ठरला आहे.

आंतरराष्ट्रीय खेळाडू व महाराष्ट्र संघाचे प्रशिक्षक श्रीराम निळे यांच्या मार्गदर्शनाखाली, शिवराज श्रीराम निळे यांच्या नेतृत्वाखाली महाराष्ट्र संघाने १७ वर्षांखालील ५०० किलो वजन गट




(मुले) मध्ये दमदार कामगिरी केली. या गटात महाराष्ट्र संघाने केरळ, कर्नाटक, हिमाचल प्रदेश आणि एन.आर. कुवेत या संघांचा प्रत्येकी २-० असा पराभव करत अंतिम फेरीत निर्विवाद वर्चस्व गाजवून सुवर्णपदक जिंकले.

या विजयी संघामध्ये शिवराज श्रीराम निळे (कर्णधार) यांच्यासह बुलढाणा जिल्ह्यातील सहकार विद्या मंदिर, मोताळा येथील खेळाडू ओम गणेशराव घडेकर, ओम सोपान चौधरी, वीरेन लक्ष्मण गालवंशी, भावेश विष्णू क्षीरसागर, मोहित मारोती खिरोडकर, शिव नीना कोलते, सुमित अविराज शिंबरे, निलेश दिनकर राठोड, हरीश गणेश जवरे यांनी सहभाग घेऊन उत्कृष्ट खेळ सादर केला. तसेच १३ वर्षांखालील ३८० किलो वजन गट (मुले) मध्येही महाराष्ट्र संघाने एन.आर. कुवेत संघाचा २-० असा पराभव करत सुवर्णपदक पटकावले.

या गटात बुलढाणा जिल्ह्यातील आरमान मोहम्मद परसूवाले (कर्णधार), गणेश लोढे, अथर्व नागेश देशमुख, रियाज अब्दुल परसुवाले, मुसाहेब खान, मुजाहिद खान आदी खेळाडूंनी चमकदार कामगिरी केली. विजेत्या खेळाडूंना टग ऑफ वॉर फेडरेशन ऑफ इंडियाचे जनरल सेक्रेटरी मान. मदन मोहन सर, महाराष्ट्र टग ऑफ वॉर असोसिएशनच्या अध्यक्ष डॉ. माधवी पाटील, सचिव जनार्दन गुपिले, राहुल वाघमारे, सतीश खरटमल तसेच प्रशिक्षक श्रीराम निळे यांच्या हस्ते ट्रॉफी व पदक देऊन सन्मानित करण्यात आले.




या उल्लेखनीय यशाबद्दल बुलढाणा जिल्हा टग ऑफ वॉर असोसिएशनचे अध्यक्ष, शिवछत्रपती पुरस्कारप्राप्त शेषनारायण लोंढे, सचिव व आंतरराष्ट्रीय प्रशिक्षक श्रीराम निळे, कोषाध्यक्ष योगेश शर्मा, राजकुमार शर्मा, जिल्हा क्रीडा अधिकारी बाळकृष्ण महानकार, तालुका क्रीडा अधिकारी रवींद्र धारपवार, तसेच सहकार विद्या मंदिर, मोताळा येथील मुख्याध्यापक अभिजीत देशमुख यांच्यासह अनेक मान्यवरांनी खेळाडूंचे अभिनंदन करून त्यांच्या पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या. ही कामगिरी केवळ बुलढाणा जिल्ह्यासाठीच नव्हे तर संपूर्ण महाराष्ट्रासाठी अभिमानास्पद ठरली असून, भविष्यातील आंतरराष्ट्रीय स्पर्धांसाठी या खेळाडूंकडून मोठ्या अपेक्षा व्यक्त केल्या जात आहेत.

## मणिपूर : अखंड सावधानता बाळगावी लागणार

गेली जवळपास दोन वर्षे वांशिक संघर्षाने ग्रस्त झालेल्या मणिपूर राज्यात आता बऱ्यापैकी स्थैर्य आल्याचे दिसत असून तेथे राजकीय प्रक्रियेचा प्रारंभ नव्याने होत आहे. या राज्यातील राष्ट्रपती राजवट उठविण्यात आली असून भारतीय जनता पक्षाचे नेते युमनाम खेमचंद सिंह यांनी मुख्यमंत्रीपदाचा कार्यभार स्वीकारला असून त्यांना साहाय्य करण्यासाठी दोन उपमुख्यमंत्रीही नियुक्त करण्यात आले आहेत. त्यांची नावे अनुक्रमे नेमचा किपगेन आणि लोसी दिखो अशी आहेत. या राज्यात नव्या मंत्र्यांचीही नियुक्ती करण्यात आली आहे. त्यामुळे मागच्या दोन वर्षांचा संघर्ष मागे टाकून हे राज्य आता पुन्हा सामाजिक सलोखा आणि विकास यांच्या दिशेने वाटचाल करु लागेल, अशी आशा जागृत झाली आहे, असे म्हणता येते. केंद्र सरकारही आता या राज्यात सामाजिक सलोखा निर्माण करण्यासाठी नव्या जोमाने आणि नव्या मार्गाने प्रयत्नशील झाले असल्याचे पहावयास मिळते. मंत्रिमंडळाच्या रचनेवरुनच याची कल्पना येते. मुख्यमंत्री सिंह हे मैतेयी समाजाचे आहेत. तर दोन उपमुख्यमंत्र्यांपैकी नेमचा किपगेन हे कुकी समाजातील, तर लोसी दिखो हे नागा जनजाती समुदायांमधील आहेत. हेच तीन समाजघटक या राज्यात प्रभावी आहेत आणि त्यांच्यातील संघर्षामुळेच हे राज्य मधल्या काळात चांगलेच ढवळून निघाले होते. आता तो कटु इतिहास मागे टाकून या नव्या मंत्रिमंडळाने आणि या राज्यातील विविध समाजघटकांनी काम करण्यास प्रारंभ केला, तर निश्चितच या राज्याचे भवितव्य उज्ज्वल असेल. मणिपूरचा भूगोल हा वैशिष्ट्यापूर्ण आहे. याचा मधला भाग हा सखल आणि सपाट आहे, तर त्याच्या चारी बाजूंनी डोंगराळ आणि टेकडीयुक्त प्रदेश आहे. सखल भागात मैतेयी समाजाची मुख्यतः वस्ती आहे, तर डोंगराळ भागांमध्ये कुकी समाज आणि नागा जनजातींचे अनेक समुदाय वास्तव्य करतात. डोंगराळ भागांमध्ये लोकवस्ती अगदी विरळ, तर मध्यभागी सखल भागात ती दाट आहे. ही भूगोलाची आणि लोकसंख्येची विभागणी कित्येकदा या राज्यातील सामाजिक संघर्षाला कारणीभूत ठरते. त्यामुळे समतोल राखणे ही राज्य सरकारची आणि केंद्र सरकारची कसोटी असते. मैतेयी समाज आणि कुकी समाज हे पारंपरिकरित्या एकमेकांचे प्रतिस्पर्धी आणि कित्येकदा एकमेकांचे शत्रू असल्याप्रमाणे वागतात आणि त्यामुळे त्यांच्यात हिंसक संघर्ष होतात. मैतेयी समाजाची मागणी आपल्याला जनजातीचा दर्जा द्यावा, अशी आहे. मात्र कुकी समाजाचा या मागणीला विरोध आहे. जनजातींसाठी ज्या सवलती दिल्या जातात, त्यांच्यात त्यांना आणखी एक वाटेकरी नको आहे, असे या विरोधाचे कारण सांगितले जाते. यातूनच काही काळापूर्वी मोठा संघर्ष या राज्यात घडला होता आणि त्यात मोठ्या प्रमाणात हिंसाचार झाला होता. डोंगराळ भाग आणि सपाट भाग असे या राज्याचे विभाजन करुन दोन राज्ये निर्माण करावी लागतात की काय, अशी परिस्थिती निर्माण झाली होती. आता येथे शांतता असली, तर ती अद्यापही अस्वस्थ आणि अस्थिरच आहे. आजही काही कुकी गटांनी राज्याच्या विभागणीची मागणी सोडलेली नाही. नव्या सरकार व्यवस्थेत आपण सहभागी होणार नाही, अशी घोषणा त्यांनी केली आहे. कुकी समुदायात किमान तीन डझन वेगवेगळे गट असून त्यांच्या वेगवेगळ्या मागण्या आहेत. त्यामुळे प्रत्येकाशी स्वतंत्ररित्या आणि एकत्रितरित्या चर्चा करणे हे एक आव्हान आहे. आता नव्या सरकारला ते स्वीकारायचे असून ते कसे पेलले जाते, यावर या राज्यातील शांततेचे स्थायीत्व अवलंबून आहे. कुकी झो हा गट कुकी समुदायातील सर्वात जहाल मानला जातो. या गटाचे नेते पेओलिनलाल होकिप यांनी पुन्हा एकदा आपल्या जहाल भूमिकेचा पुनरुच्चार केला आहे. गेल्या काही काळात कुकी लोकांचे शिरकाण करण्यात आले, असे त्यांचे म्हणणे आहे. या अन्यायाचे निराकरण होत नाही आणि राजकीय समझोत्याचे लेखी आश्वासन दिले जात नाही, तो पर्यंत आपला पक्ष विधिमंडळ नेता निवडण्याच्या प्रक्रियेत भाग घेणार नाही, अशी घोषणा त्यांनी काही दिवसांपूर्वी केली. हे पाहता, सध्याची शांतता क्षणभंगूर ठरण्याची शक्यता नाकारता येत नाही. त्यामुळे शांततावादी गटांना आपल्यासमवेत घेणे आणि हिंसाचारी गटांवर योग्य ती कारवाई करणे, अशा दोन्ही मार्गाचा अवलंब नव्या सरकारला करावा लागेल, अशी स्थिती आहे. ही स्थिती मणिपूरमध्ये आहे, तशी ती ईशान्य भारतातील अन्य छोट्या राज्यांमध्येही आहे. येथील फुटीरता आणि हिंसक अलगतावाद यांना विदेशी शक्तींचे मोठ्या प्रमाणात साहाय्य मिळते. म्यानमार आणि चीनकडून या फुटीरतावाद्यांना शस्त्रे, पैसा आणि प्रशिक्षण मिळते असा आरोप आहे. पाकिस्तानची आयएसआय ही संघटनाही भारतात शक्य तितका उच्छाद मांडण्यास सज्जच असते. या संघटनेचे हस्तकही या भागात कार्यरत असल्याची चर्चा आहे. त्यामुळे केंद्र सरकारला दुहेरी आव्हानांना तोंड द्यावे लागते. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या सरकारची दिल्लीत स्थापना झाल्यापासून ईशान्य भारतात मोठ्या प्रमाणात पायाभूत सुविधा कामे हाती घेण्यात आली आहेत. अनेक महत्त्वाचे प्रकल्प पूर्णही झाले आहेत. या प्रकल्पांचा लाभ स्थानिक जनतेला मिळू लागल्याने केंद्र सरकारच्या विरोधातील तीव्र भावना बऱ्याच प्रमाणात मवाळ झाली. केंद्र सरकारने विविध समाजघटकांशी चर्चा करुन त्यांना देशाच्या मुख्य प्रवाहात आणण्यासाठी गंभीरपणे प्रयत्न केले. त्यामुळे आज या भागातली अशांतता नियंत्रणात असली, तरी केंद्र सरकार आणि विविध राज्य सरकारे यांना डोळ्यात तेल घालून परिस्थितीवर लक्ष देणे भाग आहे. थोडीशी ढिलाई किंवा किंचितसे दुर्लक्षही परिस्थितीला वेगळे वळण लावू शकते. त्यामुळे अखंड सावधानता आणि सज्जता याच दोन सूत्रांचा उपयोग करावा लागणार आहे. वेगवेगळ्या समाजघटकांना एकत्र आणून सलोखा निर्माण करण्याचा आणि भारत एकात्म राहिला नाही, तर त्यांचेही भवितव्य असुक्षितच राहील, या वस्तुस्थितीची जाणीव फुटीरतावादी गटांमध्ये रुजविण्याचे कार्य आता करावे लागणार आहे.

# पाणी व स्वच्छता कंत्राटी कर्मचाऱ्यांचे काम बंद आंदोलनास सर्व संघटनांचा पाठिंबा

## पाच महिने पगार नाही, जगावे कसे हाच मोठा प्रश्न?

**दैनिक आपला विदर्भ**

**बुलढाणा/प्रतिनिधी:** स्वच्छ भारत मिशन (ग्रामीण) टप्पा–२ आणि जल जीवन मिशनअंतर्गत जिल्हा परिषद स्तरावर जवळपास दोन दशकांपासून कार्यरत असलेल्या कंत्राटी कर्मचाऱ्यांचे चार महिन्यांचे मानधन अद्याप थकित आहे. ऑक्टोबर २०२५ ते जानेवारी २०२६ या कालावधीतील मानधन न मिळाल्यामुळे कर्मचाऱ्यांच्या कुटुंबांच्या उपजीविकेवर गंभीर परिणाम होत आहेत.



जिल्हा व तालुका स्तरावर हे कर्मचारी ग्रामपंचायतांमधील प्रत्यक्ष अंमलबजावणी, क्षेत्रीय तपासणी, लाभार्थी समन्वय, ऑनलाईन नोंदी आणि अहवाल सादरीकरण यासह जिल्हा परिषद व पंचायत समिती स्तरावरील नियोजन व देखरेखीची जबाबदारी पार पाडत आहेत.

ार महिने मानधन न मिळाल्याने कर्मचाऱ्यांचे घरभाडे, मुलांचे शिक्षण आणि वैद्यकीय खर्च भरणे कठीण झाले आहे. तरीही ते सेवेत सतत कार्यरत आहेत. "चार महिने मानधन न मिळाल्याने आर्थिक ताण आहे, तरीही सेवा सुरू ठेवत आहोत," असे महाराष्ट्र राज्य पाणी व स्वच्छता शासकीय कंत्राटी कर्मचारी कृती समितीने सांगितले. सेवा सुरू असताना मानधन न मिळणे केवळ आर्थिक प्रश्न नाही, तर कर्मचाऱ्यांच्या दैनंदिन जीवनावर आणि मानसिक आरोग्यावर गंभीर परिणाम करणारे आहे.


या परिस्थितीबाबत महाराष्ट्र राज्य पाणी व स्वच्छता शासकीय कंत्राटी कर्मचारी कृती समितीने राज्यस्तरावर पाणी पुरवठा व स्वच्छता विभागाचे प्रधान सचिव यांना तसेच जिल्हा परिषद प्रशासनास लेखी निवेदन सादर करून सद्यस्थितीची वस्तुनिष्ठ माहिती अवगत करून दिली आहे. निवेदनात मानधन प्रलंबित राहणे हा जिल्हा परिषद स्तरावरील निर्णयाशी संबंधित नसून, निधी वितरण व प्रशासकीय प्रक्रियेतील विलंबामुळे झाला असल्याचे स्पष्ट केले आहे. तथापि, अनेक राज्यस्तरीय प्रतिनिधित्व करूनही परिस्थिती सुधारली नसल्याने, संस्थेने न्यायासाठी आणि आवश्यक कारवाईसाठी मानवाधिकार आयोगात तक्रार नोंदविली आहे.

कर्मचाऱ्यांनी दिलेल्या इशाऱ्यानुसार, ४ फेब्रुवारीपासून राज्यभर काम बंद आंदोलन सुरू केलेले आहे. तसेच ९ फेब्रुवारी २०२६ नंतर राज्यस्तरावर बेमुदत धरणे आंदोलन आयोजित केले जाणार आहे.

हे आंदोलन मंत्री महोदयांच्या निवासस्थानासमोर सुरू होईल, त्यानंतर राज्य पाणी व स्वच्छता मिशन कार्यालय परिसरात आणि मुंबईतील आझाद मैदान येथे होणार आहे. यामुळे स्वच्छ भारत मिशन (ग्रामीण) अंतर्गत २०२६२७ चा वार्षिक कृती आराखडा (), क्षेत्रीय तपासणी, अहवाल सादरीकरण, ऑनलाईन नोंदी आणि दैनंदिन प्रशासकीय कामकाजावर प्रतिकूल परिणाम होण्याची गंभीर शक्यता व्यक्त केली जात आहे. ही बाब केवळ आर्थिक नसून मानवी, प्रशासकीय आणि संविधानिक दृष्टिकोनातून अत्यंत संवेदनशील आहे. दीर्घकाळ सेवा देणाऱ्या कर्मचाऱ्यांचे मानधन तातडीने अदा करणे आवश्यक असल्याचे महाराष्ट्र राज्य पाणी व स्वच्छता शासकीय कंत्राटी कर्मचारी कृती समितीने अधोरेखित केले आहे, नाहीतर ग्रामीण पाणीपुरवठा व स्वच्छता योजनांच्या अंमलबजावणीवर गंभीर परिणाम होऊ शकतात. या आंदोलनाचा काय परिणाम होणार आहेत याकडे सर्वांचेच लक्ष लागले आहे. राज्यातील सदर कंत्राटी कर्मचारी जोपर्यंत शासन सेवेत नियमित होत नाही तोपर्यंत हे आंदोलन चालू राहणार आहे.

# मुख्यमंत्र्यांच्या दूरदृष्टीने राज्यात भूजल सुधार; ३५२ तालुक्यांत सकारात्मक बदल!

कोणत्याही राज्याला सुजलाम सुफलाम होण्यासाठी व जनतेला पिण्याचे पाणी उपलब्ध होण्यासाठी भूजलाचा स्तर चांगला असणे गरजेचे असते. भूजलस्तर सुधार म्हणजे दुष्काळापासून मुक्तता हा मंत्र ठरला आहे. राज्याला दुष्काळ मुक्त करण्याचा हाच ध्यास व मंत्र मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी उराशी बाळगून वर्ष २०१५ च्या सुरुवातीलाच 'जलयुक्त शिवार' ही महत्वाकांक्षी योजना राबविण्याचा निर्णय घेतला. या योजनेच्या प्रभावी अंमलबजावणीतून भूजलस्तर वाढून राज्यात दुष्काळी भागाची स्थिती सुधारली. या कार्यक्रमाला जोड म्हणून मुख्यमंत्र्यांच्या सक्षम नेतृत्वात राज्यामध्ये केंद्र पुरस्कृत 'प्रधानमंत्री कृषी सिंचन योजना', 'अटल भूजल योजना' आणि 'जलजीवन मिशन' ची अंमलबजावणीही प्रभावीपणे होत आहे. परिणामी केंद्र शासनाच्या दुष्काळ व्यवस्थापन संहितेप्रमाणे विहित कार्यपद्धतीत अंतर्गत भूजल दुष्काळ निर्देशांकानुसार वर्ष २०२५ अखेर राज्यातील ३५३ तालुक्यांपैकी ३५२ तालुक्यांत दुष्काळ नसल्याचे व भूजल तूट वर्गवारी सामान्य असल्याची आणि मागील दहा वर्षांच्या तुलनेत भूजल स्तर १.५२ मीटरने वाढल्याची सुवार्ता पुढे आली आहे.






राज्याच्या ग्रामीण भागातील जनतेच्या उपजीविकेचा मुख्य स्रोत शेतीच आहे, तर ८२ टक्के भूभाग हा पावसावर अवलंबून आहे. विशेषत: मराठवाडा आणि विदर्भातील काही गावांमध्ये अनिश्चित व अपुऱ्या पावसामुळे दुष्काळी स्थिती निर्माण होऊन लोकांच्या राहणीमानावर आणि शेतीवर त्याचा प्रतिकूल परिणाम होत असल्याचे चित्र होते. पिण्याच्या पाण्याची टंचाई, भूजल पातळीत होणारी तूट भरून काढण्यासाठी व या सर्व परिस्थितीत कृतीशील कार्याद्वारे बदल करण्यासाठी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या पुढाकाराने २६ जानेवारी २०१५ रोजी राज्यात 'जलयुक्त शिवार' ही महत्वाकांक्षी योजना राबविण्यास सुरुवात झाली. २५ लाख हेक्टर जमीन सिंचनाखाली आणण्याच्या उद्दिष्टातून लोकसहभागाद्वारे सूक्ष्म सिंचन आणि पावसाचे पाणी साठविण्यास सुरुवात झाली. स्थानिक जलप्रवाहांना मोठ्या जलप्रवाहांशी आणि नैसर्गिक प्रवाह उपलब्ध नसलेल्या ठिकाणी जलवाहिन्या तयार करून जलप्रवाहांशी जोडण्यात आले. पाण्याच्या प्रवाहाची आवक होऊन हे पाणी संवर्धनासाठी सूक्ष्म जलसाठ्यांमध्ये वाहून नेण्यात येऊ लागले. उपलब्ध जलप्रवाहांचे पुनरुज्जीवन करण्यावर आणि गावांमध्ये नवीन जलप्रवाह निर्माण करण्यावर भर देण्यात आला.

नद्यांच्या तळांचे रुंदीकरण आणि खोलीकरण करण्यावर भर देण्यात आला. पाण्याची झिरपण रोखण्यासाठी तलाव, तळी, शेततळे आणि कालव्यांमधून गाळ काढण्यात आला. चेकडॅम, कालवे, लहान तलाव आणि सार्वजनिक व खाजगी विहीरी बांधण्यात आल्या. पावसाच्या पाण्याची साठवण करण्यात आली. विशेष करून दुष्काळी भागात वाहून जाणारे पावसाचे पाणी अडविण्यात आले. शेतीसाठी कार्यक्षमतेने पाणी वापराबाबत जागरूकता निर्माण करून शेतकऱ्यांना प्रोत्साहन देण्यात आले आणि मोठ्या प्रमाणात वृक्षारोपणही करण्यात आले. परिणामी २०१९ पर्यंत राज्यात अतिरिक्त पाणी साठवण क्षमता निर्माण होऊन १९ हजार ६५५ गावे कायमस्वरूपी दुष्काळ मुक्त झाले. याकाळातच २२ हजार ५३९ गावांमध्ये 'जलयुक्त शिवार' योजनेच्या ६ लाख ३२ हजार ८९६ कामांद्वारे २७ लाख ८ हजार २७९ टीएमसी जलसाठा क्षमता निर्माण होऊन ३९ लाख ४ हजार ३९४ हेक्टर सिंचन क्षमतेचा भूभाग निर्माण झाला. याद्वारे २९ हजार ५४४ गावांना पाणी पुरवठा करण्याचे लक्ष पूर्ण झाले. लक्षणीय यशानंतर पुन्हा ३ जानेवारी २०२३ पासून राज्यात 'जलशिवार योजना' (२.०) सुरू करण्यात आली.

प्रत्येक शेतकऱ्यांच्या शेतास पाण्याची उपलब्धता निर्माण करणे आणि पाण्याची कार्यक्षमता वाढवून पाण्याच्या प्रत्येक थेंबातून जास्तीत जास्त पीक उत्पादन मिळविण्याच्या उद्देशाने केंद्र शासनाने वर्ष २०१५–१६ पासून 'प्रधानमंत्री कृषी सिंचन योजना' सुरू केली. राज्याच्या ३४ जिल्ह्यांमध्ये केंद्र व राज्याच्या ६०:४० हिश्श्याच्या अर्थसाहाय्याद्वारे ही योजना सुरू आहे.

माजी पंतप्रधान दिवंगत अटल बिहारी वाजपेयी यांच्या ९५ व्या जन्मदिनी २५ डिसेंबर २०१९ रोजी केंद्र शासनाने महाराष्ट्रासह सहा राज्यांच्या ७८ जिल्ह्यांमधील कायम दुर्भिक्ष असणाऱ्या ८३५० ग्रामपंचायतींसाठी 'अटल भूजल योजना' सुरू केली. जागतिक बँकेच्या सहकार्यातून केंद्र शासनाने या योजनेसाठी ६००० कोटी रुपयांस मंजुरी दिली होती. लोकसहभागातून या योजनेत अंतर्भूत सर्व ७८ जिल्ह्यांमधील ८३५० ग्रामपंचायतींचा भूजल आराखडाही संकेतस्थळावर उपलब्ध करून देण्यात आला आहे.

'जल जीवन मिशन' या केंद्र शासनाच्या जलशक्ती मंत्रालयाच्या योजनेमुळेही ग्रामीण महाराष्ट्रातील प्रत्येक ग्रामीण घराला सुरक्षित, शुद्ध आणि पुरेशा प्रमाणात पिण्याचे पाणी नळजोडणीद्वारे नियमितपणे उपलब्ध करून देण्याचा उद्देश यशस्वी होताना दिसत आहे. १५ ऑगस्ट २०१९ रोजी सुरू झालेल्या या योजनेनुसार राज्यात प्रत्येक जिल्ह्यांमध्ये 'जिल्हा पाणी व स्वच्छता मिशन' सुरू करण्यात आले. भूजल सर्वेक्षण व विकास यंत्रणा तसेच अन्य विभागांच्या समन्वयाने व जिल्हा पाणी व स्वच्छता मिशनच्या मान्यतेने जल जीवन मिशनचे जिल्हास्तरीय आराखडे तयार करण्यात येतात.

या सर्व प्रयत्नांतून राज्यातील दुष्काळी परिस्थिती सुधारत असल्याचे चित्र आहे. भूजल सर्वेक्षण आणि विकास यंत्रणेच्या भूजल दुष्काळ निर्देशांकात ते प्रकर्षाने दिसते. त्याविषयी जाणून घेवूया.

**अशी होते भूजल पातळी जाहीर**

राज्याच्या महसूल व वनविभागाचा ७ ऑक्टोबर २०१७ चा शासन निर्णय आणि केंद्र शासनाची दुष्काळ व्यवस्थापन संहिता २०१६ च्या अनुषंगाने राज्यात दुष्काळ जाहीर करण्याचे निकष व कार्यपद्धती विहित करण्यात आली आहे. यानुसार राज्यातील परिस्थितीवर देखरेख ठेवण्यासाठी प्रामुख्याने वनस्पती निर्देशांक, मृद आर्दता निर्देशांक, जलविषयक निर्देशांक व पिकांचे क्षेत्रीय सर्वेक्षण, सत्यापन विचारात घेण्यात येतात.

यातील जलविषयक निर्देशांक हा राज्याच्या पाणी पुरवठा व स्वच्छता विभागांतर्गत कार्यरत व पुणे स्थित भूजल सर्वेक्षण आणि विकास यंत्रणा (जीएसडीए) द्वारे तयार करण्यात येतो. ग्रामीण भागात पिण्याचे पाणी, शेती आणि औद्योगिक गरजांसाठी भूजलाचे सर्वेक्षण, संशोधन, नियोजन आणि विकास करणारी ही यंत्रणा तालुका निहाय भूजल दुष्काळ निर्देशांक तयार करून या निर्देशांकाचे मूल्य व त्यानुसार भूजल तुटीची वर्गवारी दर तीन महिन्याने जाहीर करते.

राज्यात एकूण ३९२० निरीक्षण विहिरी स्थिर भूजल पातळीच्या मोजणीसाठी स्थापित करण्यात आल्या आहेत. त्यापैकी ऑक्टोबर २०२५ मध्ये ३६६५ निरीक्षण विहिरींची माहिती संकलित करण्यात आली असून त्यानुसार वर्ष २०२५ चा भूजल पातळी निर्देशांक काढण्यात आला आहे. यात राज्यातील ३३ जिल्ह्यांतील ३५२ तालुक्यांमध्ये भूजल पातळी ०.१५. च्या आत असून भूजल तुटीची वर्गवारी सामान्य असून अमरावती जिल्ह्यातील चिखलदरा तालुक्यात हा निर्देशांक ०.१६ ते ०.३० दरम्यान असल्याने भूजल तुटीची वर्गवारी सौम्य वर्गात समाविष्ट आहे. ०.६० पर्यंत एकूण पाच स्तरांमध्ये भूजल पातळी निर्देशांकानुसार सामान्य, सौम्य, मध्यम, गंभीर आणि अती गंभीर अशी भूजल तुटीची वर्गवारी काढण्यात येते.

**भूजल स्तरात १.५२ मीटरने वाढ**

मागील दहा वर्षांच्या तुलनेत भूजल स्तर १.५२ मिटरने वाढला असून राज्याच्या दृष्टीने ही महत्वाची उपलब्धी आहे. मागील काही वर्षांच्या तुलनेत राज्यातील कोणताच तालुका मध्यम, गंभीर आणि अती गंभीर भूजल तुटीच्या वर्गात नसल्याने हे सकारात्मक चित्र आहे.

भूजल पातळी निर्देशांकानुसार भूजलाच्या दृष्टीने नेहमीच संवेदनशील समजल्या जाणाऱ्या विदर्भ, मराठवाडा आणि पश्चिम महाराष्ट्रात सकारात्मक बदल घडल्याचे दिसून येते. अकोला, बुलढाणा, यवतमाळ, नागपूर, जालना, बीड, धाराशिव, लातूर आणि परभणी जिल्ह्यांमधील सर्वच तालुके सामान्य भूजल तुटीच्या श्रेणीत आहेत. त्याच प्रमाणे पश्चिम महाराष्ट्रामध्येही भूजल तूट स्थिर असून पुणे, सातारा, सांगली, कोल्हापूर, नाशिक, अहिल्यानगर जिल्ह्यांमधील तालुक्यांचा यात समावेश आहे.

भुगर्भातील जल हे शाश्वत आहे. शेती, पिण्यासाठी, पर्यावरण आणि उद्योगासाठी आपणास ते वर्तमानकाळात टिकवून भविष्यासाठीही राखून ठेवायचे आहे. त्यासाठी खात्रीपूर्वक व संरक्षित सिंचन व्यवस्था निर्माण करण्याकरिता मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या दूरदृष्टीने सुरू झालेली 'जलयुक्त शिवार योजना' आणि राज्यातील दुष्काळ कायमचा नष्ट करण्यासाठी 'नदी जोड प्रकल्प' राबविण्याच्या कामालाही गती प्राप्त झाली आहे. त्याचा परिणाम होऊन झालेले बदल भूजल पातळी निर्देशांकातील आकड्यांद्वारे अधिक स्पष्ट झाले आहेत. या योजनांसह केंद्र शासनाच्या योजनांच्या प्रभावी अंमलबजावणीतून राज्याला दुष्काळ मुक्त करण्याच्या दिशेने राज्य मार्गक्रमण करीत आहे.

०००

**–रितेश मो.भुयार,**
**माहिती अधिकारी,**
**माहिती व जनसंपर्क नागपूर.**

DAINIK AAPLA VIDHARBH-Printed by Rameshwar Vishwanath Sakalkar & Published by DEVIDAS MADHAVRAO KHANPATE Printed at Shubham printing press near tahsil office Mehkar-443301 (M.S.) and Published at mehkar- malegaon road near polics Station Dongaon Dist. Buldana-443301 (Mah.) Editor DEVIDAS MADHAVRAO KHANPATE Mob.No.97672 33034 Title-Code:- MAHMAR52707

हे पत्र प्रकाशक, मालक देविदास माधवराव खनपटे यांनी शुभम प्रिंटिंग प्रेस तहसील कार्यालयाजवळ मेहकर जि. बुलडाणा-४४३३०१ (महा) येथे छापून मेहकर मालेगाव रोड पोलीस स्टेशन समोर डोणगाव, जि. बुलडाणा-४४३३०१ (महा) येथून प्रकाशित केले. मुद्रक रामेश्वर विश्वनाथ साकळकर, संपादक-देविदास माधवराव खनपटे मोबा.९७६७२ ३३०३४ पीआरबी कायद्यानुसार छापलेल्या मताशी सहमत असेलच असे नाही, वादविवाद फक्त मेहकर न्यायालया अंतर्गत, (टिप: प्रकाशित

## संक्षिप्त...

### तब्बल ३२ तासानंतर मुंबई-पुणे एक्स्प्रेसवेवरील वाहतूक पूर्ववत

दैनिक आपला विदर्भ

**मुंबई/प्रतिनिधी :** मुंबई-पुणे एक्स्प्रेसवेवरील वाहतूक तब्बल ३२ तासांनंतर पूर्ववत झाली आहे. मुंबई आणि पुणे या दोन मोठ्या शहरांमधल्या वाहतुकीचा वेग वाढावा म्हणून नव्वदच्या दशकात मुंबई-पुणे एक्स्प्रेस वे बांधण्यात आला होता. या एक्स्प्रेस वेच्या वेगाला एका अपघातानं ब्रेक लागला होता. अखेर ३२ तासांनंतर मध्यरात्री २ वाजता पुणे-मुंबई महामार्गावरील वाहतूक पूर्ववत झाली.

आडोशी बोगद्याजवळ ज्वलनशील, प्रोपलीन गॅसची वाहतूक करणारा टँकर उलटला आणि मुंबईच्या दिशेनं येणारी वाहतूक तात्काळ ठप्प झाली होती. दुर्घटनाग्रस्त टँकरमधील गॅस सुरक्षितपणे दुसऱ्या टँकरमध्ये भरण्यात आला आणि अपघातग्रस्त टँकर क्रेनच्या सहाय्यानं बाजूला करण्यात आला. अपघातग्रस्त टँकर रस्त्याच्या बाजूला करुन मुंबई-पुणे एक्स्प्रेस वेवरची वाहतूक सुरळीत करण्यात आली.

पुणे-मुंबई द्रुतगती मार्गावरील गॅसचा टँकर ३२ तासांनी हटवण्यात आला. त्यानंतर मुंबईकडे जाणारा मार्ग वाहतुकीसाठी खुला करण्यात आला. पण म ळवलीजवळ एक ट्रक बंद पडला आहे. तसेच अनेक अवजड वाहनांचे चालक झोपी गेल्याने कामशेत जवळ वाहनांच्या रांगा लागल्या होत्या. आता महामार्ग पोलीस झोपी गेलेल्या वाहन चालकांना उठवून गाड्या पुढं काढण्याचे प्रयत्न करत आहेत. त्यामुळे आडोशी बोगद्याजवळ वाहतूक सुरळीत असली तरी प्रवाशांना काहीवेळ ताटकळत बसावे लागले.

मुंबई-पुणे द्रुतगती मार्गावरील वाहतूककोंडीची दखल मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी घेतली आहे. भविष्यात अशी घटना घडू नये आणि घडल्यास आणखी कोणत्या प्रकारची सज्जता असावी, याबाबत चौकशी करुन शिफारसींसह सविस्तर अहवाल सादर करण्याचे निर्देश मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी एमएसआरडीसीला दिले आहेत. मुंबई-पुणे एक्स्प्रेस-वेवरील वाहतूक कोंडीची उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदेंनीही गंभीर दखल घेतली आहे. आपत्कालीन परिस्थितीतील वाहतूक आराखडा तत्काळ तयार करण्याच्या सूचना एकनाथ शिंदेंनी दिली आहे. सोबतच मिसिंग लिंकचे कामही लवकर पूर्ण करण्याच्या सूचना एकनाथ शिंदेंनी दिल्या आहेत.

### महाराष्ट्र शासनाचे चार वर्षे मुदतीचे १,५०० कोटी रुपयांचे रोखे विक्रीस

**मुंबई/प्रतिनिधी :** महाराष्ट्र शासनाच्या चार वर्षे मुदतीच्या १,५०० कोटींचे ६.९० टक्के महाराष्ट्र शासनाचे रोखे २०३० (४ फेब्रुवारी २०२६ रोजी उभारलेल्या) ची विक्री शासनाच्या सुधारित अधिसूचनेतील अटी आणि शर्तींच्या अधीन राहून करण्यात येईल. या कर्जाद्वारे मिळालेल्या रकमेचा विनियोग शासनाच्या विकास कामासाठी अर्थपुरवठा करण्यासाठी केला जाईल, अशी माहिती वित्त विभागाचे सचिव विकास चंद्र रस्तोगी यांनी पत्रकान्वये दिली आहे.

अस्पर्धात्मक लिलाव पद्धतीनुसार (सुधारित) एकूण अधिसूचित केलेल्या शासन कर्जरोखे रकमेच्या १० टक्के रक्कम पात्र वैयक्तिक व संस्थात्मक गुंतवणुकदारांना वाटप करण्यात येईल. मात्र एका गुंतवणुकदारास एकूण अधिसूचित रकमेच्या जास्तीत जास्त १ टक्का रकमेच्या मर्यादेपर्यंत वाटप करण्यात येईल.

भारतीय रिझर्व्ह बँकेतर्फे १० फेब्रुवारी,२०२६ रोजी बँकेच्या फोर्ट , मुंबई येथील कार्यालयात लिलाव केला जाईल. तर लिलावाचे बीडस् १० फेब्रुवारी,२०२६ रोजी संगणकीय प्रणालीनुसार, रिझर्व्ह बँक ऑफ इंडिया, कोअर बँकिंग सोल्यूशन, (ई-कुबेर) सिस्टीमनुसार सादर करावयाचे आहेत.

यामध्ये स्पर्धात्मक बिड्स संगणकीय प्रणालीद्वारे ई-कुबेर सिस्टीमनुसार सकाळी १०.३० ते ११.३० वाजेपर्यंत सादर करावेत. तर अस्पर्धात्मक बीडस् ई-कुबेर सिस्टिमनुसार सकाळी १०.३० ते ११.०० पर्यंत सादर करावेत.

# संजीवनी दर्पण पुरस्काराने अशोकराव वानखेडे सन्मानित

## लेखणीच्या माध्यमांतून समाज जागृतीचे महान कार्य करा: तहसीलदार प्रतिक्षा तेजनकर

दैनिक आपला विदर्भ

**डोणगांव/प्रतिनिधी :** सामाजिक कार्यात अग्रेसर असलेल्या स्थानिक संजीवनी सेवाभावी परिवाराच्या वतीने २७ व्या वर्धापन दिनानिमित्त आयोजित कार्यक्रमात पत्रकार अशोकराव वानखेडे यांना संजीवनी दर्पण पुरस्काराने सन्मानित करण्यात आले.यावेळी पत्रकार बांधवांना मार्गदर्शन करीत लेखणीच्या माध्यमांतून समाज जागृतीचे महान कार्य करा असे मत रिसोड जि वाशिम तहसीलदार प्रतिक्षा तेजनकर यांनी व्यक्त केले.

दि १ फेब्रुवारी रोजी राजुरकर मंगल कार्यालयात आयोजित या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी बुलढाणा जिल्हा ग्रामीण पत्रकार संघाचे जिल्हाध्यक्ष प्रमोदबाप्पु देशमुख तर प्रमुख अतिथी म्हणून तहसीलदार प्रतिक्षा तेजनकर, सहा पोलीस निरीक्षक संतोष आघाव, भारत मोरे, ठाणेदार अमरनाथ नागरे, अनिल आवटी, अकबरखा पठाण, डॉ गजानन उल्हामाले, राजेंद्र पळसकर , दिपक पाटील आखाडे, बबनराव पळसकर,डॉ नकुल फुले,आदि मान्यवर मंडळी उपस्थित होती, स्व डॉ जगदीश बिडवई यांच्या स्मृति प्रित्यर्थ दरवर्षी प्रमाणे यावर्षी सुध्दा ग्रामीण पत्रकार बांधवांना प्रेरणा मिळावी हा मुख्य उद्देश ठेवून पत्रकार बांधवांना संजीवनी दर्पण पुरस्काराने गौरविण्यात येते. या वर्षी पत्रकार अशोकराव वानखेडे,नवल राठोड,सादिक कुरेशी, गजानन देशमुख, रविंद्र वाघ यांना पुरस्काराने सन्मानित केले. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन हमीद मुल्लाजी तर आभार प्रदर्शन सुरेन्द्र सिंह चव्हाण यांनी केले.



पुरस्कार प्राप्त सर्व पत्रकार बांधवाचे जिल्हा ग्रामीण पत्रकार संघाचे अध्यक्ष प्रमोद बाप्पु देशमुख, तालुका ध्यक्ष गजानन चनेवार, सिध्देश्वर पवार,कैलास राऊत, डोणगांव पत्रकार संघाचे अध्यक्ष सचिन गाभणे,राजेश वाघमारे,सुरेश आप्पा फिसके,रफीक कुरेशी,दत्ता उमाळे, विष्णू आखरे, गणेश पळसकर, अबरार खान मिल्ली, गजानन नरवाडे आदिनी अभिनंदन करुन पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या आहे.

# जिल्ह्यात ९ फेब्रुवारीपासून 'आपदा मित्र' निवासी प्रशिक्षण

## युवक-युवतींना आपत्ती व्यवस्थापनाचे १२ दिवसांचे प्रशिक्षण

दैनिक आपला विदर्भ

**बुलढाणा/प्रतिनिधी:** राष्ट्रीय आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरणाच्या संकल्पनेतून आणि जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण, बुलढाणा यांच्या पुढाकाराने जिल्ह्यात 'आपदा मित्र' प्रशिक्षण कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. हे निवासी प्रशिक्षण ९ फेब्रुवारीपासून सुरू होणार असून २० फेब्रुवारी २०२६ पर्यंत अजिंक्य वैभव मंगल कार्यालय, कारंजा चौक, बुलढाणा येथे संपन्न होणार आहे. आपत्तीच्या काळात स्थानिक पातळीवर त्वरित आणि प्रभावी प्रतिसाद देऊन जीवितहानी कमी करणे, हा या प्रशिक्षणाचा मुख्य उद्देश आहे. या उपक्रमांतर्गत बुलढाणा जिल्ह्यातील निवड करण्यात आलेल्या तसेच इच्छुक युवक-युवतींना १२ दिवसांचे निवासी प्रशिक्षण देण्यात येणार आहे.

१८ ते ४५ वयोगटातील शारीरिक व मानसिकदृष्ट्या सक्षम नागरिक व महाविद्यालयीन विद्यार्थी या प्रशिक्षणासाठी पात्र आहेत. यामध्ये प्रामुख्याने एन.एस.एस., एन.सी. सी., नेहरू युवा केंद्र () चे विद्यार्थी, होमगार्ड, शासकीय व निमशासकीय कर्मचारी, आशा वर्कर, अंगणवाडी सेविका तसेच आपत्तीप्रवण गावातील ग्राम महसूल सहाय्यक यांचा समावेश आहे. तसेच डॉक्टर, माजी सैनिक व स्थापत्य अभियंता यांच्यासाठी वयोमर्यादा ५५ वर्षांपर्यंत शिथिल करण्यात आली आहे. प्रशिक्षण पूर्ण करणाऱ्या 'आपदा मित्रां'ना शासनाकडून ३ वर्षांसाठी ५ लाख रुपयांचा अपघात विमा तसेच वैयक्तिक आपत्कालीन प्रतिसाद संच देण्यात येणार आहे.

प्रशिक्षण कालावधीत निवास, चहा-नाश्ता व जेवणाची संपूर्ण व्यवस्था शासननियुक्त प्रशिक्षण संस्था मे. ''आयटस'' स्पोर्ट्स अँड सेफ्टी प्रा. लि. (इंडियन रेस्क्यू अकॅडमी, पुणे) यांच्यामार्फत करण्यात आली आहे. सर्व निवड झालेल्या प्रशिक्षणार्थींनी सकाळी १० वाजता नेमून दिलेल्या ठिकाणी उपस्थित राहणे अनिवार्य असून, पासपोर्ट साईज फोटो, आधार कार्ड व ओळखपत्र सोबत आणणे आवश्यक आहे.

इच्छुक उमेदवारांनी आपल्या संबंधित तहसील कार्यालयातील नैसर्गिक आपत्ती विभागाशी संपर्क साधून नोंदणी करावी. अधिक माहितीसाठी जिल्हा आपत्ती व्यवस्थापन अधिकारी श्री. संभाजी पवार, जिल्हाधिकारी कार्यालय, बुलढाणा यांच्याशी किंवा मो. ७०२०४३५९५४ / ९०११७७७२२३ या क्रमांकावर संपर्क साधण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

### मिर्झापूर द मूव्ही होणार या दिवशी रिलीज, जाणून घ्या तारीख...

**मुंबई/प्रतिनिधी:** भारतातील सर्वात मोठी आणि चाहत्यांची आवडती फ्रँचायझी मिर्झापूर आता मोठ्या पडद्यावर रिलीज होण्यासाठी सज्ज आहे. अमेझॉन एमजीएम स्टुडिओज आणि एक्सेल एंटरटेनमेंट निर्मित मिर्झापूर द मूव्ही पाहण्यासाठी अनेकजण उत्सुक आहे. या चित्रपटाची निर्माते रितेश सिधवानी आणि फरहान अख्तर आहेत. याशिवाय कासिम जगमागिया आणि विशाल रामचंदानी याची सह-निर्मिती करत आहेत. या चित्रपटाचे दिग्दर्शन गुरमीत सिंग यांनी केलं आहे. निर्मात्यांनी आता या बहुप्रतीक्षित चित्रपटाच्या प्रदर्शनाची तारीख जाहीर केल्यानंतर, मिर्झापूर द मूव्ही कधी बॉक्स ऑफिसवर ४ सप्टेंबर रोजी तुमच्या जवळच्या चित्रपटगृहात प्रदर्शित होणार आहे. मिर्झापूर द मूव्ही. आता निर्मात्यांनी शेअर केलेल्या पोस्टवर अनेकजण आपल्या प्रतिक्रिया देत आहेत.

# थकीत महसूल व गौण खनिज दंड वसुलीसाठी कडक पावले उचला

## जिल्हाधिकारी डॉ. किरण पाटील यांचे महसूल यंत्रणेला निर्देश

दैनिक आपला विदर्भ

**बुलढाणा/प्रतिनिधी:** बुलढाणा जिल्ह्यातील प्रलंबित जमीन महसूल आणि थकीत करांची १०० टक्के वसुली करण्याचे उद्दिष्ट पूर्ण करण्यासाठी जिल्हाधिकारी डॉ. किरण पाटील यांनी महसूल यंत्रणेला विशेष निर्देश दिले आहेत. महसूल वसुलीची प्रक्रिया अधिक प्रभावी करण्यासाठी आता प्रशासनाकडून सक्तीने वसुली करण्यात येणार असून, थकबाकीदारांवर दंडात्मक कारवाई करण्याचा इशाराही त्यांनी दिला आहे. विशेषतः गौण खनिजाचा अवैध उपसा करणाऱ्यांविरुद्ध जिल्हाधिकारी यांनी आक्रमक पवित्रा घेतला असून, अशा प्रकरणात प्रलंबित असलेले सर्व दंड त्वरित वसूल करण्याचे आणि दोषींवर कठोर दंडात्मक कारवाई करण्याचे आदेश त्यांनी यंत्रणेला दिले आहेत.



जिल्हाधिकारी डॉ. किरण पाटील यांनी महसूल विभागाच्या बैठकीत स्पष्ट केले की, महाराष्ट्र जमीन महसूल अधिनियम १९६६ मधील तरतुदींनुसार थकबाकीदारांवर मालमत्ता जप्तीसारखी कठोर कायदेशीर कारवाई केली जाईल. या मोहिमेअंतर्गत जिल्ह्यातील सर्व तलाठी आणि मंडळ अधिकाऱ्यांच्या पथकांना गावोगावी भेटी देऊन थेट वसुली करण्याचे आदेश देण्यात आले आहेत. प्रलंबित कर आणि गौण खनिज अवैध उपशाचा दंड भरण्यासाठी वारंवार मुदत देऊनही प्रतिसाद न देणाऱ्या थकबाकीदारांवर विशेष लक्ष केंद्रित करून त्यांच्यावर कठोर पावले उचलण्याचे अधिकार तहसीलदारांना देण्यात आले आहेत.

नागरिकांनी प्रशासकीय कारवाई आणि दंडात्मक बोजा टाळण्यासाठी आपला थकीत जमीन महसूल, कर आणि गौण खनिजाचा दंड त्वरित जमा करावा, असे आवाहन जिल्हाधिकारी डॉ. किरण पाटील यांनी केले आहे. ही मोहीम आता अधिक तीव्र करण्यात आली असून, गाव पातळीवर दररोज वसुलीचा आढावा घेतला जाणार आहे. शासकीय महसूल आणि गौण खनिजावरील दंड हा विकासकामांसाठी अत्यंत महत्त्वाचा असल्याने सर्व स्तरावर ही वसुली प्रक्रिया तातडीने पूर्ण करण्याच्या सूचना जिल्हाधिकारी यांनी दिल्या आहेत.


## शब्दकोडे क्र. 78

आडवे शब्द

१. राज्यकारभाराचे प्रमुख शहर ४. प्रत्येक वर्षी ७. 'सगळा हवाला रामावर!' याअर्थी शब्दप्रयोग १०. सुगंधी पानांची वनस्पती १२. मराठी भाषिकांचे राज्य १३. नासाडी, नाश १५. पादत्राण १७. रंगविलेले १९. अपशकुन २०. कोर्टातील खटला २१. युद्ध २३. मागील अंगण २५. बिनवासाचे पांढरे फूल २७. जागृत २९. काका (इंग्रजी) ३१. चेष्टा ३२. माधुर्य ३३. विचार करणारा, सूज्ञ ३५. ग्रामीण बोलीत घटस्फोट ३७. माफी ३९. मौज, बहार ४१. पालव ४४. इतरांहून निराळा ४६. युक्ती ४८. आपटणे, टक्कर देणे ५०. सुवर्ण ५१. मजबूत, भक्कम ५३. घोंगड्या विणणारी जमात ५४. फुरसत ५५. नवरदेव ५६. लाकूड कापण्याचे हत्यार ५८. जहर ५९. आरोप ६०. आजच्या आधीचा दिवस ६१. वाकलेला, नम्र ६३. साजसज्जा करणे ६४. उत्सवाचे दिवस ७०. इंद्र दरबारातील दोन अप्सरा ७१. अतिशय आनंद ७३. कमीजबरोबरचे वस्त्र ७४अ. कोणी तरी विशेष ७५. भेळमिसळीचा उत्तर भारतीय अवतार ७६. धातूचा धागा ७७. रवाळ ७८. अव्हेरणे, संकोचापोटी नाकारणे

उभे शब्द

१. दास जोडल्यास लाडवाचा प्रकार २. शेतकऱ्यांचा मित्र म्हटली जाणारी सापाची बिनविषारी जात ३. पाणी ५. चार वेदांपैकी एक ६. किंचीत छोटा ७. देश ८. भ्रमंती, सतत प्रवास करणे ९. सेनापती ११. एकसारखे, सदोदित १४. उथळ वाटी १६. अधाशी, लालची १८. धुसफूस, जीवाला होणारा २०. मोठा भाऊ २२. मातीचा कण असला तरी हत्ती असल्याचा आभास निर्माण करणे अर्थात एखादी घटना फुगवून सांगणे याअर्थी वाक्प्रचार २४. राज्यशकट हाकणारे मंत्रीमंडळ २६. खिडकी २८. थंड २९. अंतःकरण, अतील भाग ३०. निकट, जवळ ३२. साखरेची चव ३४. राग, क्रोध ३६. उन्हाळ्यात येणारे सुगंधी पांढरे फूल ३८. सन्मानाप्रित्यर्थ दिलेली अल्प रक्कम ४०. संकटातून, पेचातून सोडवणे याअर्थी वाक्प्रचार ४२. जाणे येणे ४३. स्थिती, अवस्था ४५. गीत ४६. हात, हस्त ४७. महिरप ४९. भय, भीती, शंका ५२. कोळशाची पूड ५३. नेहमी, निरंतर ५४. आकलन क्षमता ५६. मनाचा ओढा ५७. अरण्य ५९. आजूबाजूला ६०. व्यवस्था, कामाची देखरेख ६२. सर्कशीत हसविणारा ६३अ. भोजनानंतर मुखशुद्धी करणारा ६५. पुन्हा पुन्हा, फिरून फिरून ६६. विनंती ६७. हिंदीत परत ६८. संतोष, तृप्ती ६९. 'वॉशिंग मशीन' मध्ये न होणारी क्रिया ७२. मराठी मुलूखाचा पठारी भाग ७४. वेल ७४अ. चानी ७५. मुख्य दिशांची संख्या



### शब्दकोडे क्र. 77 चे उत्तर

आडवे उत्तर

१.कोरडा ४.पारावार ६.साय ७.पर ९.सनसनाटी १२.जावई १३.दरड १५.ललकारी १६अ.बासमती १७अ.खरोखर १८.बरबाद २०.चारा २२.राही २३.प्रकाश २५.परत २६.समास २७.हालचाल २८.सारक २९.महामार्ग ३०.रव ३१.कतरण ३३.प्रतिकारक ३४.फरार ३६.काननबाला ४१.डबा ४२.नकलाकार ४४.राजीवलोचन ४७.घसा ४८.भोज्य ४९.खार ५०.समीर ५१.सामनावीर ५३.पसा ५५.दरारा ५६.पदरमोड ५८.नरम ६०.नाश ६१.बोट ६२.कप ६३.जम ६४.समरभूमी ६६.मदतनीस ६८.रणगाडा ६९.नवनीत ७०.रया

उभे उत्तर

१.कोप २.डास ३.वास ४.पाटील ५.रजा ६.साईबाबा ७.परतीचा मार्ग ८.रड १०.नजर ११.नाल १३.दम १४.आरोही १६.काया १७.सद १७अ.खराब १८.बरकत १९.रत २१.रास २३.प्रचारक २४.कालव २५.परकर २६.समाधान २७.हानिकारक २९.मणका ३२.गेलाबाजार ३३.प्रथा ३५.रामराज्य ३७.नयन ३८.बाड ३९.पर ४०.सलोखा ४२अ.लाघवी ४३.कासार ४५.चरणारविंद ४६.ठोसा ४८.भोवरा ५०.सवड ५२.नाकाम ५४.सापट ५५.दशरथ ५७.पाप ५८.नजर ५९.रमण ६०.नाम ६२.कसर ६४.सडा ६५.मीन ६६.मत ६७.तप

# केंद्रीय आरोग्य व कुटूंब कल्याण राज्यमंत्री प्रतापराव जाधव यांनी घेतली आज महाराष्ट्रातील वैद्यकिय अधिकाऱ्यांची बैठक

## आरोग्य सेवा सहज आणि सुलभ बनविण्यासाठी उपाययोजना करा अधिकाऱ्यांच्या बैठकीत केल्या सुचना

**दैनिक आपला विदर्भ**

**बुलढाणा/प्रतिनिधी:** गोरगरीब जनतेला केंद्रबिंदु मानुन प्रत्येक व्यक्तीला उत्तमातील उत्तम आरोग्य सेवा मिळावी या दृष्टीकोनातुन आरोग्य सेवा सहज, सुलभ आणि सक्षम बनविण्याच्या दृष्टीकोनातुन कार्यप्रणाली अमंलात आणा अशा सुचना केंद्रीय आयुष आरोग्य व कुटूंब कल्याण राज्यमंत्री प्रतापराव जाधव यांनी केल्या आहेत.

आयुष मंत्रालय, आरोग्य व कुटूंब कल्याण मंत्रालय नवी दिल्ली आणि महाराष्ट्र सरकारच्या आरोग्य विभागातील वरीष्ठ अधिकाऱ्यांची बैठक आज नवी दिल्ली येथे केंद्रीय आरोग्य व कुटूंब कल्याण राज्यमंत्री प्रतापराव जाधव यांच्या अध्यक्षतेखाली संपन्न झाली. या बैठकीमध्ये प्रत्येक नागरीकांना दर्जेदार वैद्यकिय सुविधा पोहचविणे आयुष उपचार पध्दतीचा विस्तार





करणे आणि आरोग्य सेवा मजबुत करण्यासंदर्भांत चर्चा करण्यात आली. या चर्चेमध्ये बोलतांना केंद्रीय आयुष आरोग्य व कुटूंब कल्याण राज्यमंत्री प्रतापराव जाधव यांनी संबधित अधिकाऱ्यांना सुचना केल्या. यावेळी बोलतांना ते म्हणाले की पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या दुरदृष्टी नेतृत्वाखाली आम्ही ''स्वस्थ्य भारत, सशक्त भारत'' या संकल्पनेतुन निरोगी महाराष्ट्रासाठी आणि विकसीत भारतासाठी वास्तवात सहज आणि सुलभ आणि सक्षम आरोग्य सेवा देण्यासाठी आरोग्यमंत्री जे.पी.नड्डा यांच्या मार्गदर्शनाखाली काम करीत आहोत. वैद्यकिय क्षेत्रातील अधिकाऱ्यांनी सुध्दा शासनाच्या विविध योजना तळागळातील शेवटच्या घटकापर्यंत पोहचविण्यासाठी स्वयंस्फुर्तीने काम करणे गरजेचे असल्याचे मतही केंद्रीय आयुष आरोग्य व कुटूंब कल्याण राज्यमंत्री प्रतापराव जाधव यांनी या बैठकीत व्यक्त केले.

या बैठकी दरम्यान राष्ट्रीय बाल आरोग्य कार्यक्रम, क्षयरोग, किटकजन्य आजार, आयुष आरोग्य मंदिर, आयुष ग्राम यासारख्या योजनांचा आढावा घेण्यात आला. या बैठकीला आरोग्य मंत्रालयाचे संयुक्त सचिव, श्री.निपुल विनायक, सचिव आरोग्य विभाग महाराष्ट्र राज्य, डॉ.भारती बलकवडे, आयुक्त, राष्ट्रीय आरोग्य अभियान, डॉ. नितीन अंबाळेकर, संचालक, आरोग्य सेवा, डॉ. रमण घुमराळेकर संचालक आयुष विभाग महाराष्ट्र राज्य व मंत्रालयीन उच्चस्तरीय अधिकारी उपस्थित होते.

# जिल्हा परिषद सांस्कृतिक स्पर्धा कलावंतांची स्व. अजित पवार यांना आगळीवेगळी श्रद्धांजली

**दैनिक आपला विदर्भ**

**बुलढाणा/प्रतिनिधी:** जिल्हा परिषदेच्या वतीने स्थानीय जिल्हा क्रीडा संकुल येथे आयोजित अधिकारी कर्मचारी यांच्या सांस्कृतिक स्पर्धांच्या पहिल्या दिवशी रात्री सहभागी कलावंतांनी शॅडो ॲक्टच्या माध्यमातून राज्याचे उपमुख्यमंत्री स्वर्गीय अजित पवार यांना आगळीवेगळी श्रद्धांजली अर्पण केली. एकात्मिक बाल विकास सेवा योजना ग्रामीण प्रकल्प बुलढाणा यांच्या कर्मचारी कलावंत संचाच्या वतीने हे सादरीकरण करण्यात आले.

त्यामध्ये महाराष्ट्राचे उपमुख्यमंत्री तथा वित्त मंत्री असताना स्व. अजित पवार यांनी राज्यात अमलबजावणी केलेल्या विविध यशस्वी योजनांचे प्रासंगिक या शॅडो एक्ट च्या माध्यमातून करण्यात आले. तसेच विमान अपघाताच्या दुर्दैवी व दुःखद घटनेचा प्रसंग सुद्धा अतिशय संवेदनशीलतेने या कलावंतांनी उपस्थितांच्या डोळ्यासमोर उभा केला.



जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी गुलाब खरात, महिला व बालविकास विभागाचे उप मुख्य कार्यकारी अधिकारी प्रमोद एंडोले प्रकल्प अधिकारी, संदीप गवळी व डॉ. राधा बल्लाळ यांच्या मार्गदर्शनाखाली सोनाली सिद्धार्थ हिवाळे यांच्या संकल्पनेतून हा शॅडो एक्ट सादर करण्यात आला. यामध्ये सुनीता चित्ते, आशा खरे, लता तायडे, शालिनी मोरे (धाड), माया मोरे (तराडखेड), वैशाली गवई (भादोला), कुसुम हिवाळे (भादोला), रुपाली वानखेडे (डोंगर खंडाळा) या मुख्य कलावंतांसह बाल कलाकार स्वराज बर्डे यांनी अभिनय केला. त्यांच्या या भावनात्मक सादरीकरणामुळे उपस्थित प्रेक्षकांचे डोळे सुद्धा पाणावले होते.

# महात्मा बसवेश्वर सामाजिक समता, नटराज, विश्वकर्मा व क्रांतीवीर राजे उमाजी नाईक पुरस्कारासाठी अर्ज सादर करण्याचे आवाहन

**बुलढाणा/प्रतिनिधी:** इतर मागास बहुजन कल्याण विभागामार्फत सन २०२५२६ या वर्षासाठी महात्मा बसवेश्वर सामाजिक समता (शिवा) पुरस्कार, नटराज पुरस्कार, विश्वकर्मा पुरस्कार तसेच क्रांतीवीर राजे उमाजी नाईक पुरस्कार प्रदान करण्यात येणार आहेत. या पुरस्कारांसाठी पात्र व्यक्ती व संस्थांकडून अर्ज सादर करण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

सामाजिक, शैक्षणिक व आर्थिक विकासासाठी कलात्मक समाजप्रबोधन, साहित्यिक कार्य, समाजसेवा तसेच सामाजिक संघटनात्मक कार्य करणारे कलावंत, साहित्यिक, समाजप्रबोधनकार, समाजसेवक व संबंधित सामाजिक संस्थांसाठी हे पुरस्कार जाहीर करण्यात आले आहेत. समाजासाठी सामाजिक, शैक्षणिक, सांस्कृतिक, आध्यात्मिक प्रबोधन तसेच आर्थिक कल्याणासाठी उल्लेखनीय कार्य करणाऱ्या नामवंत समाजसेवक, कलावंत, समाज संघटनात्मक कार्यकर्ते, अध्यात्मिक प्रबोधनकार, साहित्यिक व सामाजिक संस्थांना सन २०२५२६ या वर्षासाठी हे पुरस्कार प्रदान करण्यात येणार आहेत. या पुरस्कारासाठी पुरुष अर्जदारांची किमान वयोमर्यादा ५० वर्षे तर महिलांसाठी किमान ४० वर्षे निश्चित करण्यात आली आहे. तसेच सामाजिक संस्थांनी संबंधित क्षेत्रात किमान १० वर्षे कार्य केलेले असणे आवश्यक आहे. इच्छुक व पात्र व्यक्ती व संस्थांनी जाहिरात प्रसिद्ध झाल्यापासून दिनांक २१ फेब्रुवारी २०२६ पर्यंत पुरस्कारासाठीचे प्रस्ताव सहाय्यक संचालक, इतर मागास बहुजन कल्याण कार्यालय, बुलढाणा, भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर सामाजिक न्याय भवन, त्रिशरण चौक, चिखली रोड, बुलढाणा येथे सादर करावेत, असे आवाहन सहाय्यक संचालक इतर मागास बहुजन कल्याण बुलढाणा मा. श्री. मनोज मेरत यांनी केले आहे.

# कुष्ठमुक्त सुरक्षित महाराष्ट्र (कुसुम) विशेष सर्व्हेक्षण मोहीमेत १६१ संशयित कुष्ठरुग्ण आढळले

**दैनिक आपला विदर्भ**

**बुलढाणा/प्रतिनिधी:** राज्यात कुष्ठरोग निर्मूलनाच्या दिशेने प्रभावी पावले उचलत स्पर्श कुष्ठरोग जनजागृती अभियान तसेच कुष्ठमुक्त सुरक्षित महाराष्ट्र (कुसुम) विशेष सर्व्हेक्षण मोहीम ३० जानेवारी ते १३ फेब्रुवारी २०२६ या कालावधीत राबविण्यात येत आहे. राष्ट्रपिता महात्मा गांधी यांच्या पुण्यतिथीनिमित्त राष्ट्रीय कुष्ठरोग निवारण दिन साजरा करून या मोहिमेचा शुभारंभ करण्यात आला. या मोहिमेअंतर्गत बुलढाणा जिल्ह्यातील ग्रामीण व शहरी भागातील सर्व प्राथमिक आरोग्य केंद्रे, ग्रामीण व उपजिल्हा रुग्णालये, सामान्य रुग्णालये, नगरपालिका दवाखाने यांच्या कार्यक्षेत्रात विशेष सर्वेक्षण सुरू आहे. यामध्ये वीटभट्ट्या, चुना भट्ट्या, गिट्टी खदानी, आश्रमशाळा, वसतिगृहे, अनाथाश्रम, वृद्धाश्रम, कारागृहे, बालसुधारगृहे, साखर कारखाने, औद्योगिक वसाहती तसेच भटके व स्थलांतरित लोकसंख्या असलेल्या ठिकाणांचा समावेश आहे. दि. ३० जानेवारी २०२६ ते ५ फेब्रुवारी २०२६ या कालावधीत जिल्ह्यातील एकूण ७६८ ठिकाणी ८,९०८ नागरिकांची कुष्ठरोग तपासणी करण्यात आली. या तपासणीत १६१ संशयित कुष्ठरुग्णांची नोंद झाली असून, त्यापैकी नवीन ३ रुग्णांचे निदान निश्चित करून उपचार सुरू करण्यात आले आहेत.

ही विशेष सर्व्हेक्षण मोहीम दि. १३ फेब्रुवारी २०२६ पर्यंत सुरू राहणार असून, नागरिकांनी या संधीचा लाभ घ्यावा, कुष्ठरोगाची तपासणी करून घ्यावी तसेच जवळच्या आरोग्य केंद्राशी संपर्क साधावा, असे आवाहन डॉ. हरी पवार, सहाय्यक संचालक, आरोग्य सेवा (कुष्ठ), बुलढाणा यांनी केले आहे.

# जिल्हा कौशल्य विकास विभागाच्या मेळाव्यात २०० उमेदवारांना जागीच नोकरी; ५५० जणांची प्राथमिक निवड






**दैनिक आपला विदर्भ**

**बुलढाणा/प्रतिनिधी:** बुलढाणा जिल्हा कौशल्य विकास विभाग आणि माऊली कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग यांच्या संयुक्त विद्यमाने २ फेब्रुवारी २०२६ रोजी शेगाव येथे पंडित दीनदयाळ उपाध्याय रोजगार मेळावा मोठ्या उत्साहात पार पडला. या मेळाव्याला जिल्ह्यातील तरुणांनी प्रचंड प्रतिसाद दिला. एकूण ३३ नामांकित कंपन्यांनी या ठिकाणी १७०० उमेदवारांच्या मुलाखती घेतल्या. त्यापैकी ५५० जणांची प्राथमिक निवड करण्यात आली, तर २०० उमेदवारांना जागीच नोकरीचे नियुक्तीपत्र देण्यात आले.

यावेळी प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित असलेले उपायुक्त द. ल. ठाकरे यांनी तरुणांना मार्गदर्शन केले. त्यांनी सांगितले की, तरुणांनी केवळ नोकरीवर अवलंबून न राहता, मिळालेल्या अनुभवातून भविष्यात स्वतःचे उद्योग सुरू करून उद्योजक बनले पाहिजे. बोर्ड ऑफ अप्रेंटिसशिपचे संचालक जुमले यांनी यावेळी शिकाऊ उमेदवारी योजनेचे महत्त्व समजावून दिले.

माऊली ग्रुपचे अध्यक्ष ज्ञानेश्वर पाटील यांनी अध्यक्षीय भाषणात सांगितले की, आमची संस्था जिल्ह्यातील तरुणांना मदत करण्यासाठी आणि कौशल्य विकासाचे कार्यक्रम राबवण्यासाठी नेहमीच तयार आहे. प्राचार्य डॉ. जाधव यांनीही यावेळी महाविद्यालयाच्या सामाजिक भूमिकेबद्दल माहिती दिली. हा मेळावा यशस्वी करण्यासाठी ट्रेनिंग ऑफिसर तुषार बढे, जिल्हा कौशल्य विकास कार्यालयाचे सहाय्यक आयुक्त ग. प्र. बिटोडे आणि त्यांच्या सहकाऱ्यांनी विशेष परिश्रम घेतले.

## वृत्तविशेष...

### शासकीय कार्यालयांनी कापड साहित्य खरेदीसाठी हातमाग महामंडळाला प्राधान्य द्यावे

**दैनिक आपला विदर्भ**

**बुलढाणा/प्रतिनिधी:** हातमाग विणकरांना नियमित रोजगार उपलब्ध करून देणे तसेच पारंपरिक हातमाग व्यवसायाला चालना देण्याच्या सामाजिक उद्देशाने महाराष्ट्र शासनाच्या अंगीकृत उपक्रमांतर्गत स्थापन करण्यात आलेल्या महाराष्ट्र राज्य हातमाग महामंडळ मर्या., नागपूर यांच्याकडून शासकीय व निमशासकीय कार्यालये, दवाखाने व वसतिगृहांनी आवश्यक कापड साहित्याची खरेदी करावी, असे आवाहन महामंडळ व्यवस्थापनाकडून करण्यात आले आहे.

सन १९७१ मध्ये कंपनी कायद्यानुसार स्थापन झालेल्या या महामंडळामार्फत बेडशिट, चादर, दरी, टॉवेल, कम्बल, ड्रेस मटेरियल यासह विविध हातमाग उत्पादने तयार करण्यात येतात. केंद्र शासनाच्या वस्त्र मंत्रालयाच्या दिनांक ०३ सप्टेंबर २००८ च्या आदेशानुसार हातमाग उद्योग टिकवून ठेवण्यासाठी ११ वस्तू आरक्षित ठेवण्यात आल्या असून, त्यामध्ये वरील उत्पादनांचा समावेश आहे. शासकीय व निमशासकीय कार्यालयांमध्ये आयोजित विविध कार्यक्रमांसाठी सत्कारमूर्ती व मान्यवर पाहुण्यांना देण्यासाठी कापडी गुलदस्ते, पैठणी व करवती स्टोल, दुपट्टे, हिमरु शॉल, पैठणी साड्या व पर्स उपलब्ध आहेत. कापडी गुलदस्त्यांमधील साहित्य दैनंदिन वापरासाठी उपयुक्त असल्याने पर्यावरणपूरक व सामाजिकदृष्ट्या लाभदायक ठरत आहे.

राज्य शासनाच्या परिपत्रक क्र. कापड २०१८/प्र.क्र.४२/टेक्स-३ दिनांक १८ एप्रिल २०१८ नुसार, विदर्भ व मराठवाडा विभाग तसेच धुळे व नंदूरबार जिल्ह्यांसाठी शासकीय पुरवठ्याचे कार्यक्षेत्र महाराष्ट्र राज्य हातमाग महामंडळ, नागपूर यांना निश्र्चित करण्यात आले आहे. तसेच उद्योग संचालनालय व मध्यवर्ती भांडार खरेदी संघटना, मुंबई यांच्या शासन निर्णयानुसार दरनिश्र्चितीची मान्यता देण्यात आलेली आहे. तरी शासकीय व निमशासकीय कार्यालये, दवाखाने व वसतिगृहांनी आवश्यक कापड साहित्याची खरेदी करण्यासाठी मुख्य भांडार विक्री केंद्र, उमरेड रोड, नागपूर येथे संपर्क साधावा, असे आवाहन करण्यात आले आहे. अधिक माहितीसाठी संकेतस्थळ www.mahahandloom.com, ई-मेल mshcngpyahoo.com किंवा मोबाईल क्रमांक ९५७९८३७७४० वर संपर्क साधता येईल.

### अमृत संस्थेच्या ड्रोन प्रशिक्षणाची कीर्ती गोव्यापर्यंत, गोवा सरकारच्या ३० अधिकाऱ्यांना 'अमृत ड्रोन मिशन' अंतर्गत प्रशिक्षण



संग्रहीत छायाचित्र

**दैनिक आपला विदर्भ**

**बुलढाणा/प्रतिनिधी:** महाराष्ट्र शासनाची स्वायत्त संस्था महाराष्ट्र संशोधन, उन्नती व प्रशिक्षण प्रबोधिनी अर्थात अमृत संस्थेकडून राबवण्यात येणाऱ्या दर्जेदार ड्रोन प्रशिक्षण कार्यक्रमाची कीर्ती आता महाराष्ट्राच्या सीमाही ओलांडून थेट गोव्यापर्यंत पोहोचली आहे. गोवा सरकारने आपल्या ३० अधिकाऱ्यांना ड्रोन पायलट प्रशिक्षण देण्यासाठी अमृत संस्थेची निवड केली असून, यासंदर्भातील प्रस्तावास मंजुरी देण्यात आली आहे.

अमृत ही संस्था खुल्या प्रवर्गातील आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकांना सक्षम करण्यासाठी विविध कौशल्यविकास व उद्योजकता प्रशिक्षण कार्यक्रम राबवते. त्याचाच एक भाग म्हणून 'अमृत ड्रोन मिशन' ही मोहीम सुरू करण्यात आली असून, ड्रोन पायलट बनण्यासाठीचे हे प्रशिक्षण लक्ष्यित घटकांसाठी पूर्णतः मोफत आहे. आतापर्यंत या प्रशिक्षणाचा लाभ १०० हून अधिक लाभार्थ्यांनी घेतला असून, अनेकांनी या कौशल्याच्या आधारे शेती फवारणी, सर्व्हे, व्हिडिओग्राफी, फोटोग्राफी तसेच विविध सरकारी प्रकल्पांच्या निरीक्षणाच्या कामातून चांगली कमाई सुरू केली आहे. सध्या राज्यातील आठ ठिकाणी अमृत संस्थेमार्फत ड्रोन प्रशिक्षण दिले जाते.

ड्रोन तंत्रज्ञानाचा वाढता वापर लक्षात घेता प्रशिक्षित मनुष्यबळाची गरज ओळखून अमृत संस्थेने हे मिशन सुरू केले. याच प्रशिक्षणाच्या गुणवत्तेने प्रभावित होऊन गोवा सरकारच्या नियोजन, सांख्यिकी व मूल्यांकन संचालनालयाचे संचालक विजय सक्सेना यांनी अमृत संस्थेचे व्यवस्थापकीय संचालक विजय जोशी यांना पत्र पाठवून प्रशिक्षणाबाबतची मंजुरी कळवली आहे.

पत्रात सक्सेना यांनी नमूद केले आहे की, ''अमृत ड्रोन मिशनअंतर्गत तयार करण्यात आलेला अभ्यासक्रम अत्यंत उच्च दर्जाचा असून, प्रशिक्षक अनुभवी व सक्षम आहेत. गोवा सरकारच्या ३० अधिकाऱ्यांना 'स्मॉल रिमोट पायलट सर्टिफिकेट प्रशिक्षण देण्यासाठी अमृत संस्थेला मंजुरी देण्यात येत आहे.'' दरम्यान, या गुणवत्तापूर्ण प्रशिक्षणाचा लाभ राज्यातील जास्तीत जास्त पात्र नागरिकांनी घ्यावा, असे आवाहन व्यवस्थापकीय संचालक विजय जोशी यांनी केले आहे.